गडचिरोली दि. २७/०७/२०१७

गडचिरोली जिल्हा पोलीस प्रशासनाच्या वतीने मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख साहेबांच्या संकल्पनेतुन सन २०१६ पासून सुरु झालेल्या जनमैत्री मेळाव्याच्या दुसऱ्या वर्षामध्ये जिल्हयातील ९ उपविभागीय स्तरावर आयेजित करण्यात आले. अशाच प्रकारे उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय गडचिरोली तर्फे दिनांक २५ ते २७ जुलै २०१७ दरम्यान जनमैत्री मेळावा व तीन दिवसीय निवासी शिबीराचे आयोजन करण्यात आले. सदर मेळाव्याकरीता उपविभागातील चामोर्शी, पोटेगाव, घोट, रेगडी येथून दुर्गम भागातील आदिवासी  बांधव बहुसंख्येने उपस्थित होते. सदर शिबीरामध्ये आलेल्या नागरिकांचे वैदयकिय अधिकारी डॉ. रामटेके यांचेकडून वैदयकिय तपासणी करून घेण्यात आली. व्यसनमुक्ती संकल्प केंद्राच्या टिमने व्यसनाधिनतामुळे मानवी आरोग्यावर कसे दुष्यपरिणाम होतात हे कलापथक व चित्रफीतीच्या मध्यमातून दाखविण्यात आले. अंधश्रध्दा निर्मुलन समितीच्या टिमने अंधश्रध्देबद्दल विविध प्रयोग सादर केले. महसुल विभाग, आदिवासी एकात्मीक प्रकल्प विभाग, वन विभाग चे अधिकाऱ्यांना निमंत्रीत करून विविध शासकिय योजनांची माहिती देवून शासकिय योजनांच्या फॉर्मचे वाटप करण्यात आले. लोकचेतना नाटय मंच पथकाने नक्षलवादी कशी दिशाभुल करून भोळयाभाबडया जनतेला कसे फसवतात व गावाचा विकास होऊ देत नाही हे पथनाटयाव्दारे सादर केले. अशा प्रकारे जनमैत्री मेळाव्याच्या समारोपीय कार्यक्रमाकरीता प्रमुख पाहुणे म्हणून मा. अपर पोलीस अधिक्षक डॉ. हरी बालाजी साहेब, श्री. नवनाथ ढवळे पोलीस उपअधिक्षक अभियान, श्री. गणेश बिरादार पोलीस उपअधिक्षक गृह, श्री. निपानी सा. नगर परिषद मुख्याधिकारी, श्री. शिंदे जिल्हा क्रिडा अधिकारी उपस्थित होते. डॉ. सागर कवडे उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी कार्यक्रमाची प्रास्ताविक माहिती देवून प्रमूख पाहुण्यांच्या हस्ते शेतीउपयोगी वस्तुंचे वाटप करण्यात आले. त्यानंतर उपस्थित आदिवासी बांधवांना दहशतवाद व नक्षलवाद विरोधी शपथ देण्यात आली. त्यानंतर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन पोलीस उपनिरीक्षक सतिश सिरसाठ यांनी केले.

